# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.09.2025** **वार:रविवार**

---

- तामिळनाडूत करूर इथं काल झालेल्या चेंगराचेंगरीतील मृतांची संख्या ३९ वर.
- बीएसएनएलच्या स्वदेशी फोर जी यंत्रणेचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन
- अमेरिकेकडून शस्त्रास्त्र खरेदीसाठी करार करण्याची योजना युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्याकडून जाहीर.
- पश्चिम बंगालमध्ये आजपासून दुर्गा पूजा उत्सवाची सुरुवात आणि
- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत 41 वर्षानंतर भारत–पाकिस्तान यांच्यात अंतिम लढत

**चेंगराचेंगरी**

तामिळनाडूत करूर इथं एका राजकीय सभेत झालेल्या चेंगराचेंगरीतील मृतांची संख्या ३९ वर पोहोचली आहे. ५० पेक्षा जास्त जखमींवर विविध रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चित्रपट अभिनेता आणि राजकीय नेता विजय यांच्या पक्षानं ही सभा आयोजित केली होती. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना दहा लाख रुपयांची तसंच अतिदक्षता विभागात उपचार घेत असलेल्यांना एक लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. दरम्यान या घटनेची चौकशी करण्यासाठी निवृत्त उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश अरुणा जगदीसन यांच्या नेतृत्वाखालील आयोगाची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उप-राष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुर्घटनेतील जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**बीएसएनएल**

आत्मनिर्भर भारत योजनेंतर्गत संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या '4G' तंत्रज्ञानावर आधारित सेवेचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ओडिशातील झारसुगुडा इथून दूरस्थ पद्धतीनं काल करण्यात आलं. फिनलँड, स्वीडन, चीन आणि दक्षिण कोरिया या चार देशांनंतर आता स्वदेशी 4जी तंत्रज्ञानाची निर्मिती करून भारत हा या क्षेत्रातील जगातला पाचवा देश ठरला आहे. या अंतर्गत बीएसएनएलच्या 92 हजार 633 मनोऱ्यांचं लोकार्पण करण्यात आलं असून, यापैकी 9 हजार 20 मनोरे महाराष्ट्रात उभारले गेले आहेत.
या '4G' नेटवर्कच्या लोकार्पणाच्या पुण्यातील कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या नेटवर्कमुळं महाराष्ट्र शासनाच्या अकराशे ऑनलाईन सेवा गावागावात पोहोचवता येतील असं त्यांनी यावेळी बोलताना सांगितलं...

बीएसएनएलची स्वदेशी '4जी'ची यशोगाथा जगात उल्लेखनीय ठरेल, आत्मनिर्भर सशक्त भारताच्या दृष्टीनं हा क्षण अत्यंत महत्वाचा असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले तर 22 महिन्यात ही तंत्रज्ञान विकसित करून भारतानं जगात नवी ओळख निर्माण केली आहे असं केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी सांगितलं.

**<u>नुकसान</u>**

महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळं आतापर्यंत सुमारे 92 लाख एकरवरील पिकांचं नुकसान झालं असल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल पुण्यात बातमीदारांना दिली. एकट्या सप्टेंबर महिन्यातच 53 लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर नुकसान झालं आहे. नुकसानापोटी आत्तापर्यंत बाधित शेतकऱ्यांना 2 हजार 250 कोटी रुपयांची मदत बँक खात्यावर जमा करण्यात आल्याचं भरणे यांनी सांगितलं. राज्यातल्या पूरस्थितीमुळे उद्ध्वस्त झालेले संसार पुन्हा उभे करण्यासाठी सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करेल, असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल दिलं. नांदेड  जिल्ह्यात कंधार तालुक्यात मणार धरण परिसरातल्या पूरबाधित नागरिकांशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधताना ते बोलत

**<u>मनकीबात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमात आपले विचार मांडतील. मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा १२६ वा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूजऑनएआयआर मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. हिंदी प्रसारणानंतर आकाशवाणी हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करेल.

**<u>जयशंकर</u>**

दहशतवाद हा एक सामायिक धोका असल्यानं त्या विरोधात  आंतरराष्ट्रीय सहकार्य मोठ्या  प्रमाणात असणं आवश्यक आहे,असं  मत परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर यांनी व्यक्त केलं. ते काल संयुक्त राष्ट्र महासभेच्या ८० व्या सत्राच्या सर्वसाधारण चर्चेत बोलत  होते. यावेळी बोलताना  त्यांनी सांगितलं  की, भारतानं   स्वातंत्र्यापासूनच दहशतवादाच्या आव्हानाचा सामना केला असून  भारताचा शेजारी देशच जागतिक दहशतवादाचे केंद्र आहे. गेल्या अनेक दशकांपासून, मोठे आंतरराष्ट्रीय  दहशतवादी हल्ल्यांची कट  कारस्थानं  याच  देशात  झाल्याचं  जयशंकर यांनी अधोरेखित केलं. सुधारणांना विरोध करणं म्हणजे संयुक्त राष्ट्रांच्या विश्वासार्हतेचा ऱ्हास असून  परिषदेचं कायमस्वरूपी सदस्यत्व वाढवण्याचं आवाहन केलं. डॉ. जयशंकर म्हणाले की जग आता व्यापारी करांमधील अस्थिरता आणि अनिश्चित बाजारपेठेचा अनुभव घेत आहे. भारताला निवडीचं स्वातंत्र्य आहे असं सांगून भारत आपल्या लोकांचे रक्षण करण्यासाठी आणि देश-विदेशात त्यांचे हितसंबंध सुरक्षित करण्यासाठी वचनबद्ध असल्याचंही जयशंकर यांनी म्हटलं आहे.

डॉ.एस.जयशंकर यांनी काल रात्री न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांची भेट घेऊन भू-राजकीय बदल आणि भारताचा दृष्टिकोन यावर चर्चा केली. तसंच जयशंकर यांनी संयुक्त

राष्ट्रांच्या आमसभेत सौदी अरेबियाचे परराष्ट्र मंत्री फैसल बिन फरहान आणि अल्जेरियाचे परराष्ट्र मंत्री अहमद अत्ताफ यांचीही भेट घेऊन द्विपक्षीय सहकार्य आणि प्रादेशिक परिस्थितीवर विचार विनिमय केला.

**संरासुप**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी जागेसाठी भारताच्या प्रयत्नांना रशियाने पुन्हा पाठिंबा दिला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या ८० व्या सत्रात, रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी सध्याच्या जागतिक परिस्थितीचे प्रतिबिंबित करण्यासाठी UNSC मध्ये सुधारणांची गरज असल्याचे प्रतिपादन केले. सध्याचा जागतिक समतोल ८० वर्षांपूर्वी संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेपेक्षा लक्षणीयरीत्या वेगळा असल्याचं लावरोव्ह यावेळी म्हणाले.

**युक्रेन**

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी अमेरिकेशी ९० अब्ज डॉलर्सचा शस्त्रास्त्रांचा मोठा करार आणि ड्रोन करार करण्याची योजना जाहीर केली. युक्रेनचे अधिकारी या महिन्यात किंवा पुढील महिन्यात या करारांवर चर्चा करण्यासाठी अमेरिकेला भेट देतील,असं झेलेन्स्की यांनी सांगितलं. युक्रेननं अलीकडेच इस्रायलकडून मिळालेली एक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली देखील तैनात केली आहे

**दुर्गापूजा**

पश्चिम बंगालमध्ये आजपासून दुर्गा पूजा उत्सवाची सुरुवात होत आहे. षष्ठी तिथीला दुर्गा पूजा सुरू होते. माँ दुर्गेला पृथ्वीवर आमंत्रित करण्यासाठी 'बोधन', 'आमोंत्रोण' आणि 'अधिवास' असे विविध विधी मोठ्या भक्तिपूर्ण वातावरणात केले जात आहेत.

**भगतसिंग**

थोर क्रांतिकारी स्वातंत्र्यसैनिक भगतसिंग यांची आज ११८ वी जयंती आहे. १९०७ मध्ये याच दिवशी भगतसिंग यांचा जन्म पंजाबमधील लयलपूर जिल्हयातील बंगा गावात झाला होता. त्यांच्या मूळ गावी खटकर कलान इथं आज राज्यस्तरीय कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून यावेळी नव्याने स्थापित केलेला १०० फूट उंच राष्ट्रीय ध्वज फडकवण्यात येणार आहे.

**विहिंप**

वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध देशभरात निदर्शनं करण्याच्या ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या योजनेवर विश्व हिंदू परिषदेनं प्रश्न उपस्थित केले असून हिंसाचार होऊ नये यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांना बारकाईने लक्ष ठेवण्याचे आवाहन केलं आहे. या प्रकरणातील अंतिम निकालाची वाट न पाहता न्यायव्यवस्थेवर दबाव निर्माण करण्यासाठी आंदोलने करण्याची योजना आखली असल्याचा आरोप करून, विहिंपने सर्वोच्च न्यायालयाला या प्रकरणाची दखल घेण्याचे आवाहन केलं आहे.

**बायोस्फीअर**

हिमाचल प्रदेशातील कोल्ड डेझर्ट बायोस्फीअर रिझर्व्हला युनेस्कोच्या जागतिक बायोस्फीअर रिझर्व्ह नेटवर्कमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. चीनमधील हांगशोउ इथं झालेल्या वर्ल्ड कॉंग्रेस ऑफ बायोस्फीअर रिझर्व्हमध्ये ही घोषणा करण्यात आली. राष्ट्रीय बायोस्फीअर रिझर्व्ह म्हणून नियुक्त केलेले कोल्ड डेझर्ट आता जागतिक पटलावरील भारताचे १३ वे स्थान बनले आहे. त्यात पिन व्हॅली राष्ट्रीय उद्यान आणि किब्बर वन्यजीव अभयारण्य यासारखी संरक्षित क्षेत्रं समाविष्ट आहेत.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आज बिहारच्या एक दिवसीय दौऱ्यावर आहेत. पाटणा इथं होणाऱ्या उन्मेषा आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित राहतील. या दौऱ्यात मुझफ्फरपूरमधील कटरा इथल्या चामुंडा देवी मंदिरालाही उपराष्ट्रपती भेट देणार आहेत.

**<u>फुटबॉल</u>**

फुटबॉलमध्ये भारताने काल कोलंबोमध्ये झालेल्या चुरशीच्या पेनल्टी शूटआउटमध्ये बांगलादेशला ४-१ असे हरवून १७ वर्षाखालील सातव्या SAFF अर्थात साऊथ एशियन फुटबॉल फेडरेशन चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावले. डल्लामुओन गंगटे आणि अझलान शाह के एच यांच्या गोलमुळे मध्यंतरापर्यंत भारत २-१ ने आघाडीवर होता, तर बांगलादेशने शेवटच्या क्षणी इहसान हबीब रिदुआनच्या बरोबरीच्या गोलने २-२ अशी बरोबरी साधली आणि सामना शूटआउटमध्ये गेला.

**<u>पॅराॲथलेटिक्स</u>**

भारताने जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ मध्ये जोरदार सुरुवात केली आहे. पहिल्याच दिवशी बिहारच्या शैलेश कुमारने उंचउडीत १ पूर्णांक ९१ मीटर उंची गाठून सुवर्णपदकासह आशियाई आणि वैयक्तिक विक्रम केला. वरुणसिंग भाटीने १ पूर्णांक ८५ मीटर उंचीने कांस्यपदक पटकावले. दीप्ती जीवनजीने महिलांच्या ४०० मीटर शर्यतीत रौप्यपदक पटकावले. पुरुषांच्या १०० मीटर फेरीत राकेशभाई भट्ट आणि श्रेयांश त्रिवेदी अंतिम फेरीसाठी पात्र ठरले. ही स्पर्धा नवी दिल्ली येथे सुरू आहे.

**<u>क्रिकेट</u>**

दुबईमध्ये आशिया क्रिकेट करंडकात आज भारत आणि पाकिस्तान यांच्यात अंतिम सामना होत आहे. भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता हा सामना सुरू होईल. ४१ वर्षांच्या आशिया करंडकाच्या इतिहासात प्रथमच भारत - पाकिस्तान यांच्यात अंतिम सामना होत आहे. आतापर्यंत पाकिस्तानने भारताविरुद्ध १५ पैकी १२ टी-२० सामने गमावले आहेत.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**